# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/७८८

दिनांक : 13 JUL 2017

विषय : श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण संस्था नांदेड या संस्थेच्या बाबा हरनाम सिंग ऑफ लंगर साहिब गुरूद्वारा ट्रस्ट,नांदेड यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आलेलया जागांबाबत....

संदर्भ : प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश नियमावलीतील Shedule I

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत दिनांक २५.४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील प्रवेश नियम विहीत केले आहेत.त्याआधारे संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत Shedule I मध्ये श्री गुरू गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण संस्था नांदेड या संस्थेच्या प्रत्येक अभियांत्रिकीच्या शाखेत दोन जागा बाबा हरनाम सिंग ऑफ लंगर साहिब गुरूद्वारा ट्रस्ट,नांदेड यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आल्याचे व त्याकरिता संचालक, एसजीजीएस नांदेड यांचेकडे अर्ज करावा असे नमूद केलेले आहे.

यासंदर्भाने शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण- २०१७/ प्र.क्र २५१/ तांशि- ४, दिनांक १९.६.२०१७ अन्वये कळविल्यानुसार उपरोक्त जागांवरील प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेकडे अर्ज न करता बाबा हरनाम सिंग ऑफ लंगर साहिब गुरूद्वारा ट्रस्ट,नगीना घाट,नांदेड यांचेकडे अर्ज करावा.

व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेच्या आधारावर करणे अभिप्रेत असल्याने बाबा हरनाम सिंग ऑफ लंगर साहिब गुरूद्वारा ट्रस्टच्या शिफारशीनुसार सदर प्रवेश गुणवत्तेनुसार करण्यात येतील.

**(चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से)

संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Budage\२०१७-१८\Engg\SGGS Letter for additional special seats.docx